भाजपच्या माजी नगरसेवकांमध्ये धाकधूक

लोकसभा निवडणुकीत नगरसेवकांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन होणार

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या माजी नगरसेवकांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. निवडणुकीत दिलेली जबाबदारी नगरसेवकांनी योग्य पद्धतीने पार पडाली की नाही, याचा अहवाल भाजपमधील सुकाणू समिती करणार आहे. हा अहवाल प्रदेशच्या वरिष्ठ नेत्यांना देण्यात येणार आहे. नगरसेवकांनी केलेल्या कामाच्या मूल्यमापनावरच महापालिका निवडणुकतील उमेदवारीबाबतचा विचार होणार आहे. त्यामुळे नगरसेवकांची धाकधूक वाढली आहे.

पुणे लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान झाले. निवडणुकीसाठी भाजपने पुण्याचे उमेदवार म्हणून मुरलीधर मोहोळ यांचे नाव दीड महिने आधीच जाहीर केले होते. निवडणुकीसाठी एकूण चार उमेदवार रिंगणात असले तरी, मुरलीधर मोहोळ आणि काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यातच लढत झाली. प्रारंभी एकतर्फी वाटणारी ही लढत शेवटच्या टप्प्यात कमालीची चुरशीची ठरली.

निवडणुकीच्या प्रचारावेळी भाजपचे काही नगरसेवक काम करत नसल्याच्या तक्रारी सातत्याने काही पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आल्या होत्या. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेले २७ नगरसेवकही नाराज असल्याची चर्चा होती. त्यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांनीही नगरसेवकांचे कान टोचले होते. त्यानंतर आता प्रदेश पातळीवरून नगरसेवकांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन होणार आहे. कोथरूडचे आमदार आणि राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

निवडणुकीत प्रत्यक्षात बूथ स्तरावर किती मतदान झाले. पन्नाप्रमुख किती मतदारांपर्यंत पोहोचले. आजी माजी आमदार, नगरसेवकांनी त्यांना दिलेली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली की नाही, याचा अभ्यास करून स्वतंत्र अहवाल तयार करण्यात येणार आहे. हा अहवाल प्रदेशच्या वरिष्ठ नेत्यांना देण्यात येणार आहे. त्यावरून पुढील विधानसभा आणि महापालिका निवडणुकीतील उमेदवारीचा निर्णय होणार असल्याचे भाजपकडून सांगण्यात आले.

'महादेव बेटिंग ॲप'च्या माध्यमातून सट्टेबाजीसाठी ४५२ बँक खात्यांचा वापर

नारायणगाव येथे कारवाई; पोलीस तपासात माहिती उघड

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'महादेव बुक ॲप' या बेकायदा बेटिंग ॲपच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली असून, जुगारातील पैसा परदेशातही वळविण्यात आल्याचा संशय आहे. नारायणगावातील एका इमारतीत छापा टाकून पोलिसांनी ६२ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, जुगारातील आर्थिक व्यवहारांसाठी ४५२ बँक खात्याचा वापर करण्यात आल्याची माहिती तपासात उघडकीस आली आहे.

महादेव बेटिंग ॲपच्या माध्यमातून बेकायदा सट्टेबाजी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर देशभरात कारवाई करण्यात आली. पुणे ग्रामीण पोलिसांच्या पथकाने नारायणगावातील एका इमारतीत छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ४५ लॅपटॉप, ८९ मोबाइल संच, तसेच आरोपींच्या वापरातील १०१ मोबाइल संच आणि ४५२ बँक खात्यांची पुस्तिका, अन्य साहित्य असा ६२ लाख ७४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींनी ऑनलाइन सट्टेबाजीसाठी बँक खात्यांचा वापर केला आहे. ही खाती कोणाच्या नावे काढण्यात आली आहेत, तसेच बनावट कागदपत्रांचा वापर करून खाती काढण्यात आली आहेत का? यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महादेव बेटिंग ॲप प्रकरणात ९३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी ८८ जणांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासासाठी त्यांच्या पोलीस कोठडीचे हक्क अबाधित ठेवण्यात आले आहेत. याप्रकरणात कुणाल भट, समीर युनुस पठाण, अमजद खान, यश चौहान, रशीद कमाल रफीउल्ली यांना अटक करण्यात आली आहे. आरोपी नारायणगावातील ऑनलाइन जुगाराचे कामकाज सांभाळत होते. ते पदवीधर आहेत.

पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी सत्यसाई कार्तिक, रवींद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, किरण अवचर, सतीश होडगर आणि पथकाने ही कारवाई केली.

'बीपीओ'च्या नावाखाली जुगार; मुख्य सूत्रधार पसार

नारायणगावातील ऋतिक कोठारी, सलमान मिरजकर उर्फ पठाण, राज बकोरिया आणि साथीदारांनी नारायणगावात 'बीपीओ' सुरू करण्यात येणार असल्याची बतावणी जागामालकाकडे केली होती. त्यांच्याकडून इमारत भाडेतत्त्वावर घेतली होती. दीड ते दोन महिन्यांपूर्वी त्यांनी जागा भाड्याने घेतली होती. बीपीओत देशभरातील तरुण काम करत होते, अशी माहिती तपासात निष्पन्न झाली आहे.

> महादेव बेटिंग ॲपच्या माध्यमातून मिळालेला पैसा देशविघातक कारवायात वळविण्यात आला आहे का, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. ऑनलाइन सट्टेबाजीतून मिळालेला पैसा परदेशात वळविण्यात आला आहे. नारायणगावात बीपीओच्या नावाखाली ऑनलाइन जुगार सुरू होता. तेथे काम करणाऱ्या आरोपींना याची माहिती होती.
> – **पंकज देशमुख**, पोलीस अधीक्षक

'विनाअनुदानित'मधील शिक्षकांची 'अनुदानित'मध्ये बदली शक्य

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शैक्षणिक संस्थेची काही अनुदानित आणि काही विनाअनुदानित महाविद्यालये असल्यास विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना त्याच संस्थेच्या अनुदानित महाविद्यालयात काम करण्याची संधी मिळणार आहे. एका प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानंतर राज्य शासनाने शासन निर्णय प्रसिद्ध करून शिक्षकांच्या अनुदानित विभागात बदल्यांवरील स्थगिती उठवल्याचे स्पष्ट केले.

राज्य शासनाने ८ जून २०२० रोजी अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र खासगी शाळा सेवा शर्ती विनियमन अधिनियम १९७७ मधील नियम ४१ अ मध्ये सुधारणा करून विनाअनुदानित विभागात काम करणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या त्याच व्यवस्थापनाच्या अनुदानित विभागात बदल्या करण्याची तरतूद केली होती. या बदल्यांबाबत १ एप्रिल २०२१ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला होता. त्यानुसार १ डिसेंबर २०२२ पर्यंत बदल्या होत होत्या. मात्र अशा प्रकारच्या बदल्यांना मान्यता देताना शिक्षणाधिकारी कार्यालयात अनियमितता होत असल्याने आणि या संदर्भात शासनाकडे अनेक तक्रारी दाखल झाल्याचे कारण देत शासनाने संबंधित बदल्या स्थगित केल्या होत्या. त्यामुळे अनुदानित विभागातील बदलीस शिक्षणाधिकारी मान्यता देत नव्हते. परिणामी अनेक शिक्षक बदली होऊन वेतनापासून वंचित राहिले होते.

या पार्श्वभूमीवर प्रीतम शिंदे विरुद्ध महाराष्ट्र शासन या रिट याचिकेत सातारा जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांनी नागपूर खंडपीठाच्या १ डिसेंबर २०२२ शासन निर्णय रद्द केलेल्या निर्णयाची दखल घेतलेली नाही, असे याचिकाकर्त्यांचे वकील के. डी. ढमाले यांनी न्यायालयास निदर्शनास आणून देत बदल्या सुरू करणेबाबत शासनाला योग्य ते निर्देश देण्याची मागणी उच्च न्यायालयाकडे केली. न्यायालयाच्या निर्देशांमुळे शासनाने २९ एप्रिल रोजी तातडीने परिपत्रक प्रसिद्ध करून अनुदानित विभागात होणाऱ्या शिक्षकांच्या बदल्यांवरील स्थगिती उठवल्याचे जाहीर केले.

बदली मान्यतेची अनेक प्रकरणे न्यायालयात आणि शासकीय कार्यालयात प्रलंबित असल्याने शासनाने योग्य वेळेत सदर प्रकरणांवर कार्यवाही करावी, शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्याबाबत शासनाने परिपत्रकात नमूद केले आहे. सातारा शिक्षणाधिकारी यांनी प्रीतम शिंदे यांचा प्रस्ताव अमान्य करण्याचा निर्णय न्यायालयाने रद्दबातल ठरवत त्यांच्या प्रस्तावावर दोन महिन्यांत नियमांनुसार मान्यता देण्याबाबत पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले, अशी माहिती ॲड. ढमाले यांनी दिली.

टँकर मंजुरीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : गेल्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने यंदा उन्हाळ्यात तीव्र दुष्काळ जाणवत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून टँकर मंजुरीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. आता टँकर मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांऐवजी प्रांत अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सध्या जिल्ह्यातील १० तालुक्यांत २२९ टँकर सुरू आहेत. मेअखेरपर्यंत आणखी टँकर वाढण्याची शक्यता असून, टँकरची मागणी झाल्यानंतर त्याची पडताळणी करून तातडीने टँकर सुरू करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

गेल्या वर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईमुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात टँकर सुरू झाले होते. उन्हाळा संपून पावसाळा सुरू झाल्यानंतर कमी पावसामुळे टँकर सुरूच राहिले होते. गेल्या वर्षी उन्हाळ्यात चालू झालेले पाण्याचे टँकर अद्यापही सुरूच आहेत. पाणीटंचाईमुळे यंदा टँकरची संख्या वाढली आहे. त्यामुळे टँकर मंजुरीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले असून, ते अधिकार प्रांत अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील गावांत, वाड्या-वस्त्यांमध्ये पाण्याचे टँकर आवश्यक असल्यास प्रांत कार्यालयात मागणी केल्यानंतर टँकर सुरू केले जात आहेत, अशी माहिती रोहयोच्या उपजिल्हाधिकारी दीप्ती सूर्यवंशी यांनी दिली.

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीसोबत घृणास्पद कृत्य

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : चारित्र्याच्या संशयावरून २८ वर्षीय पत्नीच्या गुप्तांगाला खिळ्यांनी छिद्र पाडून कुलूप बसविल्याची धक्कादायक घटना वाकड परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी ३० वर्षीय आरोपी पतीला पोलिसांनी अटक केली. पीडितेवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

वाकड परिसरात हे नेपाळी दाम्पत्य वास्तव्यास आहे. आरोपी हा सुरक्षारक्षकाचे काम करतो. तर, महिला गृहिणी आहे. ११ मे रोजी चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीला बेदम मारहाण केली. ब्लेडने गुप्तांगावर वार केले. चाकू हातात घेत जीवे मारण्याची धमकी देत दोन्ही हात-पाय ओढणीच्या सहाय्याने बांधले.

लोखंडी खिळ्याने गुप्तांगाला दोन्ही बाजूने छिद्र पाडले. तिथे पितळी कुलूप बसवले असल्याचे पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या अमानवीय कृत्याबद्दल पीडितेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.

कॉर्पोरेट कार्यालय/मुख्यालय: जीआयसीएचएफएल, नॅशनल इन्शुरन्स बिल्डींग, सहावा मजला, जे.टी.रोड, ॲस्टोरिया हॉटेलशेजारी, चर्चगेट, मुंबई 400020. टेली: (022) 43041900 ईमेल: corporate@gichf.com वेबसाईट: www.gichfindia.com
हडपसर शाखा कार्यालय: ऑफिस क्र. 212, दुसरा मजला, जयमाला बिजनेस कोर्ट, ई-विंग, हुंडाई शोरूमच्या वर, मांजरी बु., पुणे-सोलापूर रोड, पुणे- 412307
संपर्क: सुरेश वाघचौरे : 8237311112 चिंचवड शाखा: ऑफिस क्र. 202 व 203, दुसरा मजला, प्रीमियर प्लाझा क्क्र जी विंग, जुना पुणे-मुंबई हायवे, हस्तकला साडी दुकानाच्या वर, चिंचवड, पुणे ङ्क 411019. ऑफिस टेली: 020-66308121, शाखेचा ईमेल आयडी: chinchwad@gichfindia.com
संपर्क तपशील: अमेय मैराळ: 9834833606. पुणे शाखा कार्यालय: नीळकंठ, सीटीएस क्र. 1018, एफ पी क्र. 370, दीप बंगला चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र 411016. टेली: (020) 25659730 / 25671230 ईमेल: pune@gichfindia.com संपर्क तपशील: राजेंद्र गिरी ङ्क 9552161428

ई-लिलाव विक्री सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. (जीआयसीएचएफएल) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील कर्जदार/गहाणकारांना मागणी सूचना पाठविल्या होत्या ज्यात त्यांना सदर सूचनेत नमूद थकबाकी रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. परंतु, कर्जदार/गहाणकारांनी सदर थकबाकी रकमेचा भरणा न केल्याने निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) व अनु. 14 अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

अ. क्र.	कर्ज फाईल क्र./ कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदाराचे नाव	मालमत्तेचा पत्ता/ मालमत्तेचे क्षेत्रफळ (बिल्ट-अप क्षेत्रफळ चौ.फू.मध्ये)	मागणी सूचना प्रकाशन दिनांक	प्रत्यक्ष ताबा दिनांक	08.05.2024 रोजीची एकूण थकबाकी (पीओएस, व्याज आणि इतर खर्चासह) (रु.)	आरक्षित किंमत (रुपये)
1	**MH0680600000346** अर्जदार- श्री रुपेश गोरख माळी सह-अर्जदार- श्री रोहित गोरख माळी सह-अर्जदार- श्री गोरख गोपाल माळी/ शाखा- हडपसर	**मालमत्तेचा पत्ता:** सीटीएस क्र. 458, सदनिका क्र. 103, पहिला मजला, चिंतामणी प्रांगण, मांजरी गावठाण परिसर, मांजरी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, मांजरी बु. गाव, तालुका हवेली, पुणे- 412307. **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 832 चौ.फू.**	10.05.2022	06-11-2023	रु. 26,27,436/-	रु. 26,05,680/-
2	**MH0680600000647** अर्जदार- श्री अरुल अनिल दाभोळे सह-अर्जदार- श्रीमती शिल्पा अतुल दाभोळे शाखा- हडपसर	**मालमत्तेचा पत्ता:** स.क्र. 176 (नवा), 148 (जुना), हिस्सा क्र. 2/1, अंबर हाईटस को-ऑप. हा. सो. लि., सदनिका क्र. 06, पहिला मजला, बेकराई माता स्कूल आणि त्रिमूर्ती नगर सोसायटीशेजारी, फुरसुंगी (धमालवाडी) गाव, तालुका हवेली, जिल्हा पुणे- 411028 **बिल्ट-अप क्षेत्रफळ:385 चौ.फू.**	08-08-2022	08-01-2024	रु. 9,29,878/-	रु. 12,13,200/-
3	**MH0680600000239** अर्जदार- श्री राजकुमार सुरेश जाधव सह-अर्जदार- श्री योगिया राजकुमार जाधव शाखा- हडपसर	**मालमत्तेचा पत्ता:** सदनिका क्र. ई-1, पाचवा मजला, अबोली हाईटस, स.क्र. 95, घ.क्र. 6बी/1सी, घुले वस्ती, ए.एम. कॉलेजशेजारी, स्वामी समर्थ मंदिराजवळ, मांजरी बु. गाव, ता.हवेली, जि. पुणे- 412307 **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 505 चौ.फू.**	04-01-2019	25-03-2021	रु. 25,73,132/-	रु. 14,54,400/-
4	**MH0270610003918** पद्माकर एल नाईक आणि सविता एल नाईक शाखा- चिंचवड	सदनिका क्र. सी1-201, दुसरा मजला, सी1 बिल्डींग, मंत्रा रेसिडेन्सी, गट क्र. 1, निघोजे, पुणे- 410501 **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 574 चौ.फू.**	01.06.2021	02-02-2024	रु. 2428416/-	रु. 18,59,760/-
5	**MH0270610004149** अमित दिनकर लांडगे/ लीलाबाई डी लांडगे शाखा- चिंचवड	सदनिका क्र. 408, चौथा मजला, ए-विंग, हिरा पार्क, स.क्र. 19/20, 19/21, 19/22, 19/23, मोरडेवाडी, मंचर, पुणे- 410503 **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 633 चौ.फू.**	07.07.2021	18.01.2024	रु. 14,25,859/-	रु. 15,03,850/-
6	**MH0270610003483** विजय मधुकर सहारे/हर्ष विजय सहारे जामीनदार- महेश उत्तम शिंगोटे शाखा- चिंचवड	सदनिका क्र. 43, तिसरा मजला, द्वारका, बिल्डींग ए-4, गट क्र. 122 + 123, महाळुंगे, पुणे- 410501. **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 420 चौ.फू.**	02.02.2022	02.02.2024	रु. 10,68,297/-	रु. 12,76,800/-
7	**MH0270600102971** राजपूत सतीश यकोब/ राजपूत सुरेखा सतीश जामीनदार- सतीश सदाशिव काळे/ शाखा- चिंचवड	सदनिका क्र. ए-10, दुसरा मजला, श्री गणेश अपा., स.क्र. 122, प्लॉट क्र. 2, गोपालवाडी, दौंड, पुणे- 413801 **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 760 चौ.फू.**	05.04.2022	20.02.2024	रु. 4,44,310/-	रु. 20,52,000/-
8	**MH0270610002130** दिवंगत विल्सन महेंद्र सकपाळ आणि द्वारे त्यांचे कायदेशीर वारस आणि दिवंगत महेंद्र शांताराम sakpal आणि द्वारे त्यांचे कायदेशीर वारस शाखा- चिंचवड	सदनिका क्र. 803, आठवा मजला, सी-विंग, डेस्टीनेशन ओस्टीया फे-1, गट क्र. 216, दुदुलगाव, पुणे- 412105 **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 568 चौ.फू.**	09.06.2022	22.02.2024	रु. 25,43,712/-	रु. 25,56,000/-
9	**MH0130610003817** प्राजक्ता दुर्गे आणि माधुरी दिलीप दुर्गे शाखा- पुणे	गट क्र. 88, लक्ष्मी दामोदर पार्क, सदनिका ए/404 व ए/405, चौथा मजला, वेल्हा रोड, सिद्धिविनायक हॉस्पिटलजवळ, नसरापूर, तालुका भोर, पुणे, पिन कोड- 412213 **बिल्ट-अप क्षेत्रफळ: 1130 चौ.फू.**	25.10.2021	05-07-2022	रु. 36,16,560/-	रु. 26,00,000/-
10	**MH0130610001801** अनिल काशीराम शिर्के शाखा- पुणे	स.क्र. 8, घ.क्र. 4, श्री दत्त संस्कृती रेसिडेन्सी, घर क्र. 401, चौथा मजला, दाभाडी, ठक्कर ग्रीन बिल्डींगशेजारी, आंबेगाव, आंबेगाव बु., महाराष्ट्र, पिन कोड- 411046.	25-10-2021	10-06-2022	रु. 16,03,485/-	रु. 14,01,000/-
11	**MH0130610004216** वैशाली संतोष गवारे शाखा- पुणे	स.क्र. 129/2/1ए, आर्या आर्केड, घर क्र. 103, पहिला मजला, गट क्र. जुना 925, चारहोळी, आळंदी रोड, सुवर्णयुग बँकेच्या वर, चोवीसवाडी गाव, चारहोळी बु., तालुका हवेली, महाराष्ट्र, पिन कोड- 412105	11-08-2021	22-07-2022	रु. 24,09,657/-	रु. 20,89,620/-

ई-लिलावाचा दिनांक व वेळ: दि. 20-06-2024 रोजी (https://www.bankauctions.in) या वेब-पोर्टलवर दु. 3.00 ते 4.00 वाजेपर्यंत प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारांसह.

ऑनलाईन पद्धतीने किंवा वर नमूद जीआयसीएचएफ कार्यालयात बयाणा रक्कम व केवायसीसह विहित निविदा प्रपत्रातील निविदा/मोहरबंद बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे 18-06-2024 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत.

वर नमूद मत्ता/ मालमत्तांच्या ई-लिलावाद्वारे (सर्फेसी अधिनियम, 2002 आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांमधील अटी व शर्तींच्या अनुषंगाने) विक्रीसाठी सदर जाहीर सूचनेशिवायजीआयसीएचएफएल हे सदर मालमत्तांची ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर खरेदी करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने किंवा मोहरबंद लिफाफ्यांमधील प्रस्ताव आमंत्रित करत आहेत.

लिलावाद्वारे विक्रीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:

1. ई-लिलाव हा **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'', तेथे जे काही आहे'' आणि ''उपाय नाही''** तत्त्वावर ''ऑनलाईन'' घेण्यात येणार आहे. हा ई-लिलाव जीआयसीएचएफ चे मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार ''मे. 4क्लोजर'' यांचेद्वारे राबविण्यात येईल.
2. **इच्छुक बोलीदारांनी https://bankauctions.in/ या पोर्टलवर आपले नाव नोंदवावे आणि आपला युजर आयडी व पासवर्ड निःशुल्क प्राप्त करावा. संभाव्य बोलीदार सेवा पुरवठादार मे. 4क्लोजर, # 605 ए, सहावा मजला, मैत्रीवनम, अमीरपेट, हैदराबाद- 500038, तेलंगाना यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. ऑफिस लँड लाईन: 040-23736405; बॅकएंड टीम: 8142000062 / 66, श्री प्रकाश- 8142000064,prakash@bankauctions.in, मालमत्तेच्या चौकशीसाठी, संपर्क तपशील: सुरेश वाघचौरे: 8237311112 (हडपसर), अमेय मैराळ: 9834833606 (चिंचवड) आणि राजेंद्र गिरी- 9552161428 (पुणे).**
3. सदर ई-लिलाव विक्री ही सर्फेसी अधिनियम/ नियम 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या आणि खाली / वेबसाईटवर नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या तसेच इच्छुक / सहभागी होणारया बोलीदारांनी सादर केलेल्या प्रस्ताव / बोली दस्तावेजामधील अटींच्या अधीन असेल.
4. ऑनलाईन ई-लिलावात सहभागी होण्यासाठी प्रत्येक बोलीदाराकडे स्वतःचा ईमेल ॲड्रेस असणे आवश्यक आहे.
5. एकदा इच्छुक बोलीदाराने जीआयसीएचएफ च्या प्राधिकृत अधिकारयासमक्ष पात्र निविदाकार म्हणून औपचारिक नोंदणी केली, की त्याला दस्तावेज सादर करून ई-लिलाव बोली मंचाच्या माध्यमातून सहभागी होण्यात आपल्याला रस आहे हे दर्शवावे लागेल. ई-लिलाव सेवा पुरवठादाराकडून आपला लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी निविदाकाराची / ऑनलाईन बोलीदाराची असेल.
6. वर नमूद मालमत्तांची विक्री वर नमूद आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस करण्यात येणार नाही.
7. **इच्छुक बोलीदारांनी वर नमूद त्या-त्या आरक्षित किमतीच्या 10% एवढी बयाणा रक्कम जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. यांचे नावे काढलेल्या डीडी/आरटीजीएस/एनईएफटी च्या माध्यमातून सादर करावी, तपशील याप्रमाणे आहे: बँकेचे नाव: युनियन बँक ऑफ इंडिया,खाते क्र. 005111010000039 - खात्याचे नाव: जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.लिलाव खाते, शाखेचे नाव: फोर्ट, पत्ता: यूबीआय, 239 बँकबे रेक्लेमेशन, नरीमन पॉइन्ट, मुंबई, महाराष्ट्र पिनकोड 400021,आयएफएससी कोड- UBIN0800511.**
8. यशस्वी बोलीदारांच्या बाबतीत सदर बयाणा रक्कम समायोजित करण्यात येईल, अन्यथा परत करण्यात येईल. सदर बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.
9. वर नमूद बयाणा रकमेसह प्रस्ताव पॅन कार्ड व पत्त्याच्या पुराव्यासह बयाणा रक्कम व केवायसी दस्तावेजांच्या स्कॅन केलेल्या प्रतीसह सेवा पुरवठादाराकडे https://bankauctions.in/ या पोर्टलच्या माध्यमातून ''ऑनलाईन'' सादर करता येईल किंवा किंवा बोली प्रपत्र, बयाणा रक्कम आणि केवायसी दस्तावेज असलेला मोहरबंद लिफाफा सादर करून सादर करता येईल आणि हा लिफाफा जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. च्या संबंधित शाखा कार्यालयातबयाणा रक्कम सादरीकरणासाठी असलेल्या शेवटच्या दिनांकाअगोदर पोचता करावा.
10. की, निविदा उघडण्यात आल्यानंतर, किमान आरक्षित किमतीएवढ्या रकमेच्या बोली सादर करणारया इच्छुक बोलीदारांना प्राधिकृत अधिकारयांच्या परवानगीने त्यांच्या बोली रकमेत वाढ करण्याची संधी देण्यात येईल.
11. प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विक्रीच्या संदर्भात प्रस्ताव स्वीकारल्यानंतर यशस्वी बोलीदारास ताबडतोब तोवर भरलेली बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम जमा करावी लागेल, अन्यथा बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. विक्री किमतीपैकी उर्वरित 75% रकमेचा भरणा प्राधिकृत अधिकारयांनी परवानगी दिल्यास विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत करावा लागेल. विहित कालावधीत उर्वरित रक्कम जमा करण्यात न आल्यास तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकारयांना या संदर्भात यशस्वी बोलीदारास ही रक्कम जप्त करण्यात येणार असल्याबाबत आणखी कुठलीही सूचना देण्याची गरज नाही.
12. बोलीदारांवर हे ''खरेदीदाराने सावध असावे'' हे तत्त्व लागू असेल आणि त्यांनी फर्म किंवा अनामत मत्तेवरील कोणतेही बोजे, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कर, प्राप्ती कर, सीमा शुल्क, कामगार थकबाकी, वीज व मेंटेनन्सची थकबाकी इ. बाबत स्वतः चौकशी करून खात्री करून घ्यावी. सर्व देणी म्हणजे महापालिका कर, मेंटेनन्स / सोसायटीची शुल्के, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. चा तसेच विक्री किमतीव्यतिरिक्त संबंधित मालमत्तांशी संबंधित सर्व देण्यांसह इतर सर्व आनुषंगिक शुल्के, खर्च इ. चा भरणा यशस्वी बोलीदारास करावा लागेल.
13. यशस्वी बोलीदारास अनामत मत्ता आपल्या नावे करून घेण्यासाठी लागणारे नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, किंवा इतर कोणतीही देणी यांसारख्या विक्री प्रमाणपत्रावर देय शुल्काचा भरणा करावा लागेल.
14. विक्री प्रमाणपत्र हे संपूर्ण विक्री रक्कम प्राप्त झाल्यावरच केवळ यशस्वी बोलीदाराच्या नावेच जारी करण्यात येईल.
15. याद्वारे कर्जदार, गहाणकार आणि जामीनदारास सूचित करण्यात येते की ते ई-लिलाव विक्रीच्या अटी व शर्तींनुसार वर नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी इच्छुक खरेदीदारांना सोबत आणू शकतात.
16. विनंती केल्यास प्राधिकृत अधिकारयांच्या सोयीनुसार वर नमूद मालमत्तेची पाहणी करता येईल.
17. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च प्रस्ताव किंवा कोणताही किंवा सर्वच प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नसून कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार ते राखून ठेवतात.
18. वर नमूद मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांसाठी जीआयसीएचएफएल जबाबदार नाहीत. मालमत्तेची विक्री ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'', ''तेथे जे काही आहे'' आणि ''कोणताही उपाय नाही'' तत्त्वावर करण्यात येईल.

सर्फेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 30 दिवसाची वैधानिक विक्री सूचना

विक्रीच्या अटी व शर्तींच्या संपूर्ण तपशीलासाठी आणि मालमत्तांच्या वर्णनासाठी कृपया मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार ''मे. 4क्लोजर'' यांची https://www.bankauctions.in ही वेबसाईट पाहावी.

दिनांक: 18.05.2024
स्थान: हडपसर, चिंचवड, पुणे

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि. करिता,
स्वा/-
प्राधिकृत अधिकारी

Chola

चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड
चोला कॉर्पोरेट कार्यालय: चोला क्रेस्ट, सुपर बी, सी54 आणि सी55, 4, थिरू वी का इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नई- 600 032, तमिळनाडू.

जाहीर सूचना

या सूचनेद्वारे, आम्ही सर्वसामान्य जनतेला सूचित करत आहोत की, **श्री. ब्रजोगोपाल गोबरधन दास मुख्य कर्जदार आणि सह-कर्जदार म्हणून सौ. माधबी ब्रजोगोपाल दास यांनी मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड (सीआयएफसीएल) कडून कर्ज करार क्रमांक XOHLNUP00001796683 अंतर्गत आर्थिक सुविधांचा लाभ घेतला होता आणि सीआयएफसीएलच्या नावे मालमत्ता तारण ठेवली,** जिचे वर्णन खाली अधिक स्पष्ट केले आहे:-
पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, **फ्लॅट क्र. 301, तिसऱ्या मजल्यावर, "आर के होम्स" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात, एस. क्र. 278, हिस्सा क्र. 1+2/1 + 3/2/3/1 यावर बांधलेले, धानोरी, ता. हवेली, जि.: पुणे येथे स्थित.**
आमच्या कंपनीच्या नावे टायटल डीडचे मेमोरँडम ऑफ डिपॉझिट अंमलात आणून ही मालमत्ता आमच्या कंपनीकडे तारण ठेवली आहे जी उप निबंधक क्रमांक